# तरुण भारत CLASSIFIEDS

## नोकरी

**गरजू सिमेंट चे ब्लॉक्स बनविण्या करिता,** मेहनती कामगार घेणे आहे. राहण्याची सोय होईल. पत्ता : नागोवा–गोवा (म्हापसाजवळ) फोन ९७३०६४८८९७ (GCM203240]

**पाहिजेत! फॅब्रिकेशन फीटर आणि** कॉन्ट्रॅक्टर ग्रील गेट आणि रेलींग कामासाठी. योग्य उमेदवारांसाठी योग्य वेतन. संपर्क : मेटल फॅब्रिक इंडिया प्लॉट नं. ७५, पीळर्ण, गोवा इंडस्ट्री. फोन : ८७८८५७३०५०, ९८३४६४९२२३ (GCM500492)

**माशेल येथील राज बारसाठी त्वरीत** तंदुरी कुक व किचन हेल्पर पाहिजे. संपर्क: ९८२२१६४८२१ (GCM500250)

**मडगाव येथे घरात राहून घरकाम** व स्वयंपाक करण्यासाठी तसेच मुलांचा सांभाळ करण्यासाठी प्रामाणिक व हुशार दोन मुली पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क: मो. ९९१६९०२२९५ (GCM500135)

**साईराम कंपनीमध्ये मुले/मुली व** महिला पाहिजेत. शिक्षण अट नाही. राहणे व जेवण सोय. पगार १० ते १५ हजार. म्हापसा/मडगाव. मो. ८५५१०१०२०३, ९३५९५१४१५७ (KC 700360)

**वसुली अधिकारी नेमणे आहे. एका** नामांकित फायनान्स कंपनीला साऊथ गोवासाठी रिकव्हरी एजंट नेमणे आहेत. फिक्स सॅलरी + इन्सेटिव्ह, स्वत:ची दुचाकी असणे आवश्यक. संपर्क–संतोष गावडे ७८८८१७७७०५ Mail-vighneshagency01@gmail.com (CM 600153)

**Top Sheild urgent** requirement, delivery boys for Area Pernem Mapuca, Phonda, Quepem and Verna. office boy (wharehouse) area verna. Fixed salary, ESIC+PF+ Petrol allowance. Call- Rukell 9923484748 (CM 601139)

**Urgently Required Mechanic** with minimum Experience of 5 to 6 years in Volvo Machinery and dumpers reparing and maintance. Contact- 9011063160, 8408094607 (CM 601143)

**Wanted experienced packers** helpers, and experienced data entry opertor with computer knowledge in a supermarket at karaswada mapusa goa. Contact -8806123222

GCM-203183

**Employees Co.op Cr.Soc. Ltd.** Requires Clerk cum office Assistant in around Usgao or Ponda. Qualification B.Com or BBA having Knowledge of Accounts, MS word, Excel. Fresher candidate may also apply within 7 days. Email-neccs_01@rediffmail.com. Contact: 8554998500 (GCM 203191)

**Wanted Data Entry Operators** in Panjim, Bambolim, Curtorim, Sanguem, Quepem, Margao, Ponda. Freshers welcome. Mail CV goadataentry@yahoo.com (GCM 203238)

**Need staff for sales packaging** for a Retail Store in Panaji Please Contact at 9819765249 Between 11 am to 5 pm only. (GCM 203123)

**Wanted Trained Graduate** Teacher (Undergraduate cadre) to teach English from Standard V to X on Child Care Leave Vacancy. Appear for walk-in-interview at Shree Ganesh High School, Ganeshpuri. Mhapsa on21.9.2020 at 09.45am alongwith handwritten application and other testimonials. (GCM203154)

**Q" Rose Enterprises Taan** Stockists at Curti Ponda requires Salesmen/Office Girl in around Ponda. Attractive salary+incentives. Call : 9960609920/ 8669184885 (GCM203244)

## खरेदी/विक्री

**Available shops/Offices of** different sizes suitable for supermarkets, gyms, Dr. Clinic, CA films etc. Sitara Atrium, Margao Navelim Highway. Ready possession, No. GST Finance available. Contact : 98504988880 (GCM203237)

**Mahalaxmi Developers offers** Premium Flats Two & Three BHK & Double height shops with attached toilet at Khadpabandh Ponda with two passenger lifts, infinity swimming pool, club house, stilt car parking etc. For booking contact Arvind Dhaimodkar: 8329765285 mahalaxmidevelopers18@gmail.com www.mahalaxmidevelopersgoa.com Rera no: PRGO06180525 (GCM203227)

## प्लॉट खरेदी-विक्री

***NO GST* Possession by** December 1BHK flat with parking & Shops for sale at Orgao-Marcel behind HDFC Bank. Contact:- Pankaj builders 9822103828. RERA No.- PRGO10180627. (GCM 203040)

**Clear title plots for sale with** Sanad at Danva, Thivim. From 374 to 630 sq mtrs Buyers pls contact8669141490 (GCM203178)

**N/A Plots for sale in madkaim,** Goa area 280 sq mtr @9000/- pr sq mtr interested party plz call 9545187676 / 9975352499 brokers not allow. (GCM 203123)

## फ्लॅट खरेदी-विक्री

**1BHK under Construction Flats** in gated Community at Kadamba Plateau, Old Goa near Healthway Hospital and walkable distance from Sharada Mandir School Price 29,49,000/- Contact: 07391086523/09922916255 RERA No. PRGO 011906 (TG2017654)

**"Ready flats @ CALANGUTE/** MAPUSA, 1 BHK / 2 BHK, fully furnished / unfurnished with all amenities for sale. Calangute Rs 99.99 lakhs & Mapusa starting Rs 34.84 lakhs.Sudin Naik Developers – 9890708660 (GCM2019068

**2BHK Flats / 3 BHK 2** Bungalows for sale in Omkar Colony, Madel Tivim. Under construction. RERA approved. Contact: 9823035102, 9403626457 (GCM 202903)

**Flats for sale at Shanta sadan** Karmali, Single and double bedroom with stilt Parking in Chitra housing Colony. cont. 9822486452 (brokers excuse) (GCM 203154)

**Ready Possesion flat for sale** at Riharsh residency Margao aquem at third floor with lift and Parking cont. 9822486452 (GCM 203154)

**Ready possesion flat for sale** at caranzalem at urban woods 90m2 double bled room on 1st floor cont. 9822486452 (Brokers excuse) (GCM 203154)

**Wanted 1/2/3 BHK flat** or Bungalow in Panjim/ Caranzalem / Dona Paula/ Porvorim etc. many more. www.aasmagroupgoa.com, 8308033821 / 9588427924. (TC2016067)

**For Sale 2BHK Flats under** construction near ID hospital Tisk Ponda, with lift & stilted car parking @44.7 lakh. Contact Gauri: 8329765285 Rera no. PRGO05201120 www.rera.goa.in / mahalaxmidevelopersgoa.com (GCM203227)

## शिक्षण

**10th / 12th / MBA / MCA / MSW** / BCA/ BBA/ B.Com / MA / BA / Msc / Bsc.UGC / DEB, Govt. Recognised Distance Education Contact: - BIDE, Panaji-GOA. Tel: - 2431014, 9765565781 / 83. (GCM 202506)

## भविष्य

**केरळा, बंगाली मांत्रिक पंडित** कुमार (एम.ए.) कठीण समस्यांना अचूक फळ. तंत्रमंत्र शक्तीने परिहार शतासिद्ध. लग्नातील अडचण, स्त्री–पुरूष प्रेम, लैंगिक समस्या, संतानप्राप्ती, घरातील अशांती, कर्जबाधा, शारीरिक पीडा, पती–पत्नी भांडण, शत्रूनाश, अनेक समस्यांसाठी भेटा : त्रिदल कॉम्प्लेक्स, सिंडीकेट बँकेसमोर, मारूती गल्ली, बेळगाव, मो. ९८८६४ ३७१४३. (BT 202897)

**कोणतीही करणी बाधा असो,** कामात रुकावट साठी रामबाण उपाय, कुठे काम होत नसेल यांनी एक वेळेस आवश्य भेटा. विश्वास हाच अनुभव. व्यवसाय, विवाह, शिक्षण, संतान, पितृदोष, कालसर्प, नागदोष, त्रिदोष, राजयोग. इत्यादी हवनद्वार पूर्ण निवारण, दिलीप गुरुजी,मडगाव – गोवा संपर्क: +९१ ९३९०४७७५८९ (GCM 203034)

**तंत्र-मंत्र सम्राट अरविंदजी** नोकरी, व्यवसाय, घरातील कसलीही समस्या, सौतन, दु:ख, प्रेम प्रकरण, मनासारख प्रेम, शत्रुपासून सुटका, तीन दिवसात निकाल. संपर्क: ९९८७२५८७९८ (गोवा) (GCM 202923)

## विविध

**we offer competitive and** reasonable rates for women's Paying guests & teffin Service. Cont. Smt. Prema G. Naik, Khadpabandh, Ponda-Goa Mob: 9923632997 (GCM 203205)

**If you are struck in economic** Crises in covid Pandemic than we have a Job/Employment Opportunity to Earn Rs 25K/ Month to 1 Lakh in 3 Months By Home sitting Contact: 9405336549, 7798882213 (GCM 203220)

## वैद्यकीय

**दारु सोडवा. हरे कृष्ण** व्यसनमुक्ती केंद्र. हजारो लोकांनी घेतला अनुभव. सात दिवसात व्यसनमुक्ती न सांगता, समक्ष न आणता आपल्या प्रिय व्यक्तीची दारु सोडवा व सुखी आयुष्य जगा. १००% व्यसन मुक्त होणारच. दारु, गुटखा, सिगारेट, ड्रग्ज इ. व्यसनावर इलाज केला जाईल. संपर्क : मो. ८४०८०१३५६५ , ९१४५३८६४७० गोवा (GCM 500131)

## भाड्याने देण/घेणे

**98 sq. mtr. 2 bhk Flat , 3rd, floor, with** lift for rent opposite Roy Farm, Tivim. Call David-9892769666 / 8779621749 (GCM203159

**17.75 sq.mtr shop, double** height with water facility classic Building (A) shop No. 7, near unity hall verem Contact: 8850478957 (Uday Pednekar) (GCM203119

**Road facing shop & 2 BHK flat** for rent in Ponda Goa interested party plz call 9545187676 / 9975352499 Broker don't. (GCM 203123)

**2 BHK & 1 BHK flat for rent** near Cocoquiro junection porvorim north Goa Contact: 9823830899 (GCM500493)

## पेस्ट कंट्रोल

**Indane Pest Control Pvt. Ltd.,** ISO Certified Company. We conduct the Pest Control Work of Bedbugs, Lizzard, Ants and Anti-Termite treatment. For Institute, Residency, Industries etc. Sanitiazation for COVID-19. Mo.9372021919, 9595098605 (LC801027)

### वाचकांना निवेदन

तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती केवळ जाहिरातदाराने दिलेल्या माहितीनुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातीत प्रसिद्ध झालेला मजकूर व त्याची सत्यता या बाबतीत हे वृत्तपत्र कोणतीही हमी देऊ शकत नाही. वाचकांना सूचित करण्यात येत आहे की, जाहिरातीतील कोणताही मजकूर – माहिती किंवा दावा दिशाभूल करणारा किंवा खोटा ठरल्यास, उद्भवणाऱ्या आर्थिक अथवा इतर प्रकारच्या नुकसानीकरिता संबंधित जाहिरातदार स्वत: जबाबदार राहतील. तरुण भारत, त्याचे व्यवस्थापन, मालक किंवा प्रकाशनातील कोणताही घटक यास जबाबदार राहणार नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

**व्यवस्थापक**

Call us 9011036448
BOOK YOUR CLASSIFIED ADS IN GOA'S No.1 Marathi Daily News Paper

# होंडा कदंब बसस्थानक परिसरात पार्ट्या

## परिसरात रिकाम्या बाटल्यांचा खच, प्रकार नागरिकांसाठी धोकादायक

प्रतिनिधी
वाळपई

गोवा सरकारचा पांढरा हत्ती म्हणून ओळखला जाणारा होंडा बसस्थानक परिसर तळीरामांचा अड्डा बनला आहे. गेल्या काही दिवसापासून मोठ्याप्रमाणात या ठिकाणी रात्रभर दारूच्या पार्ट्या सुरू असल्यामुळे नागरिकांनी चिंता व्यक्त केली असून सदर प्रकार त्वरित बंद करावा, अशी मागणी करण्यात आलेली आहे. होंडा पोलीस चौकीपासून अवघ्याच अंतरावर असलेल्या या बसस्थानकावर रात्रभर तळीरामांच्या पार्ट्या सुरू असताना पोलीस यंत्रणा याकडे मुद्दाम दुर्लक्ष करत तर नाही ना ? असा सवाल नागरिकांनी केला आहे.

होंडा येथे कोट्यवधी रुपये खर्च करून बसस्थानकाची उभारणी केलेली आहे. सध्या सदर बसस्थानकाचा ताबा कदंब महामंडळाकडे दिलेला आहे. गेल्या काही दिवसांपासून बसस्थानक परिसरात दारूच्या पार्ट्या सुरू असून प्रदूषण होत असल्याचे समोर आले आहे. याबाबत तक्रारी अनेकवार करून सुद्धा त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

दरम्यान सदर कदंब बस स्थानकावर फेरफटका मारला असता परिसरात रिकाम्या बाटल्यांचा खच असल्याचे पहावयास मिळत आहे.



होंडा : बसस्थानक परिसरात जमा करून ठेवलेल्या दारूच्या बाटल्या.

### रात्रभर धिंगाणा नागरिकांसाठी डोकेदुखी

या बसस्थानकावर नागरिकांची वर्दळ नसल्यामुळे रात्रभर तळीरामांचा धिंगाणा होत असल्याचे चित्र समोर आले आहे. अनेकवेळा तक्रारी करून सुद्धा स्थानिक पोलीस त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. होंडा पंचायतीच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे या पंचायतीचा प्रशासकीय कारभार कदंब बसस्थानकावरील जागेमध्ये हलविलेला आहे. या तळीरामांच्या पार्टीविषयी पंचायतीने अनेकवार तक्रारी केल्या आहेत. मात्र संबंधितांनी याची दखल घेतलेली नाही, अशी माहिती सुत्रांनी दिली.

# पेडणे तालुक्यात १६ कोरोना रुग्णांची नोंद

**पेडणे** : पेडणे तालुक्यात काल दिवसभरात नवीन १६ कोरोनाबाधित सापडल्याने आतापर्यंत ८६३ कोरोनाबाधितांची नोंद झाली आहे. काल दिवसभरात कोरगाव १, पालये १, पेडणे २ धारगळ २, तुये २, तळर्ण २, मोपा २, आगरवाडा १ व हळर्ण ३ मिळून १६ कोरोना बाधित सापडले आहेत. आतापर्यंत तालुक्यात कोरोनाने नऊ जणांचे बळी घेतलेले आहेत. आतापर्यंत मांद्रे पंचायत क्षेत्रात १३५ तर पेडणे पालिका क्षेत्रात ८५ रुग्ण सापडले आहेत. हरमल ६३, केरी १९, मोरजी २८, कासारवर्णे १५, नईबाग १२, पार्से ३६, वझरी ३८, वारखंड २७, पोरस्कडे १, पालये १५, विर्नोडा २६, कोरगाव ५३, हसापूर ८, धारगळ ७५, तुये ६९, तांबोसे ८, तळर्ण ९, चोपडे ९, मालपे ७, खाजने १, नागझर १६, तोरसे १४, मोपा २९, इब्रामपूर ८, उगवे २७, आगरवाडा १८, हळर्ण ५, चांदेल २ मिळून ८६३ कोरोनाबाधित रुग्ण सापडले आहेत.

# सांखळी परिसरात २७ कोरोनाबाधित सापडले

प्रतिनिधी
सांखळी

सांखळी मतदारसंघात रविवारी २७ कोरोनाबाधित रूग्ण सापडले तर १८ जण बरे होऊन घरी परतले अहेत, अशी माहिती मामलेदार प्रवीणजय पंडित यांनी दिली.

उपलब्ध माहितीनुसार सांखळी मतदारसंघात दिवसेंदिवस कोरोना रूग्णसंख्या वाढत असल्याने नागरिकांनी स्वत:ची काळजी घेणे आवश्यक झाले आहे. तसेच प्रत्येकाने सरकारने घालून दिलेल्या नियमांचे पालन करतानाच नियमितपणे रोगप्रतिकारकशक्ती वाढवावी. डॉक्टरांकडून या महामारी विषयावर सविस्तर माहिती जाणून घेणे जरूरीचे आहे, असे मामलेदार प्रवीणजय पंडित यांनी यावेळी सांगितले.



सांखळी : नागरिकांना कोरोनासंबंधी आवश्यक माहिती आणि सरकारी नियम तसेच सरकारी योजनांची माहिती देताना मामलेदार प्रवीणजय पंडित.

# सर्व आमदारांचे वेतन बंद करावे

## काँग्रेस प्रवक्ते ट्रॉजन डिमेलो यांची मागणी

प्रतिनिधी
पणजी

राज्यातील सर्व ४० आमदारांचे वेतन बंद करण्याची मागणी काँग्रेस पक्षाने केली असून सर्व खासगी हॉस्पिटल्स त्यांच्या विविध आरोग्य सेवेच्या दरांसह कोरोना रुग्णांसाठी खुली करावीत, अशी सूचना केली आहे.

पणजीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते ट्रॉजन डिमेलो यांनी सांगितले की, गोव्यातील आमदारांना सध्या काहीच काम नाही. त्यामुळे त्यांना वेतन देण्याची गरज नाही. गोव्याची आर्थिक परिस्थिती बिकट झालेली असताना आमदारांचे वेतन त्वरित थांबवण्याची गरज आहे. व्हिआयपींनी खासगी हॉस्पिटलात जावे आणि सर्वसामान्य लोकांनी गोमेकॉत जावे हा भेदभाव कशासाठी? असा प्रश्नही डिमेलो यांनी उपस्थित केला आहे.

सर्वसामान्य माणूस जर खासगी हॉस्पिटलात गेला आणि उपचार घेतल्यानंतर बिल पाहून त्याला 'हार्ट ॲटॅक' येतो अशी परिस्थिती आहे. म्हणून खासगी हॉस्पिटल्सचे दर जनतेसाठी जाहीर करावेत. ठराविक खासगी हॉस्पिटल्स फक्त कोरोनासाठी खुली केल्याने डिमेलो यांनी आश्चर्य प्रकट केले. त्यांचे व सरकारचे काहीतरी लागेबांधे असावेत अशी शंकाही त्यांनी वर्तवली.

**कोरोना रुग्णांशी सरकारकडून खेळ**

कोरोनाचे रुग्ण प्रतिदिन १००० पर्यंत वाढणार अशी भाषा आरोग्यमंत्री विश्वजित राणे करतात तर डॉ. सावंत हे बेड वाढवणार म्हणून निवेदने करतात. हे त्यांचे वक्तव्य जनतेला घाबरवण्याचा प्रकार असून ते आक्षेपार्ह असल्याचे मत डिमेलो यांनी प्रकट केले. मडगाव येथील नवीन जिल्हा इस्पितळाचे दोन मजले अजून कार्यान्वित का केले नाहीत? याचे उत्तर देण्याची मागणी त्यांनी केली. कोरोना रुग्णांशी सरकारने खेळ चालवला असून त्यांचा जीव जात असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. रुग्णांना योग्य उपचार देण्याची सरकारकडे यंत्रणा नसल्याची टीका त्यांनी केली.

# दिगंबर प्रभू वेळगेकर यांचे निधन

**मडगाव** : दाभाळ सारख्या ग्रामीण भागात कृषी क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे प्रगतशील शेतकरी दिगंबर प्रभू वेळगेकर यांचे काल रविवार दि. १३ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६.१० वा. अल्पआजाराने निधन झाले. आज सोमवार दि. १४ रोजी सकाळी १० वा. दाभाळ येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.



त्यांच्या पश्चात पत्नी शुभलक्ष्मी प्रभू वेळगेकर तसेच दोन विवाहित कन्या तसेच जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# द. जिल्हा इस्पितळात 'आरटी–पीसीआर' चाचण्या सुरू कराव्यात

## गोवा फॉरवर्डचे विजय सरदेसाई यांची मागणी : गोमेकॉतही सर्व सुविधा उपलब्ध करण्याची गरज

प्रतिनिधी
मडगाव

कोविडच्या वाढत्या फैलावाच्या पार्श्वभूमीवर चाचण्या वाढविण्याची गरज असून 'आरटी–पीसीआर' मशीनद्वारे या चाचण्या होण्याची गरज आहे. गोमेकॉतच असे यंत्र असून द. गोवा जिल्हा इस्पितळातही असे यंत्र बसवून चाचण्या कराव्यात तसेच गोमेकॉत असलेल्या सुविधा जिल्हा रुग्णालयात सुरू कराव्यात, अशी मागणी गोवा फॉरवर्डचे अध्यक्ष व फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी उचलून धरली आहे.

फातोर्डातील कदंब बसस्थानकाच्या नजीक वृक्षरोपण केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. मडगाव पालिका नगराध्यक्ष पूजा नाईक, अन्य नगरसेवक व पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. कोविड रुग्णसंख्या वाढत चालली आहे. मात्र सुविधा कमी पडू लागल्या आहेत. चाचण्या वाढायला हव्यात. कोविड रुग्णांसाठी जिल्हा इस्पितळाचे वरील दोन मजले निगा केंद्र म्हणून वापरात आणावेत तसेच फातोर्डा मतदारसंघातील रुग्णांना तेथे प्राधान्यक्रमाने सामावून घ्यावे, अशी मागणी त्यांनी उचलून धरली.



फातोर्डा : रोपटे लावताना आमदार विजय सरदेसाई. बाजूला नगराध्यक्षा पूजा नाईक, अन्य नगरसेवक व गोवा फॉरवर्डचे पदाधिकारी.

**घरी विलगीकरणात राहणाऱ्या रुग्णांकडून नियमांचे उल्लंघन**

जेथे रुग्णांची सोय करणे शक्य आहे अशा सर्व सरकारी जागा वापरात आणण्यासाठी सरकारने पावले उचलण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बहुतांश रुग्ण घरीच विलगीकरणात राहण्यास प्राधान्य देत आहेत. मात्र अशा रुग्णांची माहिती स्थानिक नगरसेवकांना देण्याची गरज आहे. तसे होताना दिसत नसून असे रुग्ण घराबाहेर पडत असल्याने कोविडचा फैलाव वाढत असल्याचा दावा सरदेसाई यांनी केला.

### राजकीय सर्वेक्षण म्हणजे लक्ष दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न

एका इंग्रजी दैनिकात राजकीय सर्वेक्षणाचे निकाल प्रसिद्ध केले असता ४१ टक्के जनता भाजपमागे असल्याचे ऐकून कित्येकांना धक्का बसला असेल. ही वेळ राजकीय सर्वेक्षण करण्याची नसून कोविडमुळे भयभीत झालेल्या जनतेला चांगल्या सुविधा उपलब्ध करून धीर देणे आवश्यक आहे. मात्र सरकार लक्ष दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न करत आहे, अशी टीका सरदेसाई यांनी केली. पंचायतमंत्री या घडीला स्थगित असलेल्या जि. पं. निवडणुका घेऊ शकतात का, असा सवाल त्यांनी केला. राज्यात दिवसाला ७४० व देशात ९७ हजार रुग्ण सापडल्याची नोंद झाली असताना या घडीला हे राजकीय सर्वेक्षण कुठून आले, असे ते म्हणाले.

# रानटी जनावरे जंगलात स्थिरावण्यासाठी फळझाडांची लागवड आवश्यक : मनोहर जोशी

प्रतिनिधी
वाळपई

सत्तरीत गेल्या दहा वर्षापासून रानटी जनावरांचा लोकवस्तीमध्ये उपद्रव वाढलेला आहे. यामुळे आज शेती बागायती करणे मुश्कील होऊन बसत असून वनखाते व म्हादई अभयारण्याच्या व्यवस्थापनाने जंगलात फळझाडांची लागवड करणे उत्तम पर्याय असल्याचे, मत मलपण येथील शेतकरी तथा निवृत्त मुख्याध्यापक मनोहर जोशी यांनी व्यक्त केले आहे.

सरकाराने जंगलात फळझांडाची लागवड केल्यास रानटी जनावरे जंगलातच स्थिरावतील. आपले पोट भरण्यासाठी ती लोकवस्तीमध्ये येणार नाहीत. यामुळे जंगलात फळझाडांची लागवड करणे हा उत्तम पर्याय असल्याचे जोशी यांनी सांगितले.



**सरकारने गांभीर्याने विचार करावा**

सत्तरी तालुक्यात लाखो चौरस मीटर जमीन ओसाड पडलेली आहे. त्यामुळे रानटी जनावरांचा उपद्रव लोकवस्तीत वाढू लागलेला आहे. गवेरेडे, रानडुक्कर, बिबटे, माकड, शेकरू आदी रानटी जनावरांचा उपद्रव गेल्या जवळपास दहा वर्षापासून वाढत आहे. एका बाजूने सरकार कृषी बागायतीच्या माध्यमातून गोवा स्वावलंबी व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहे. मात्र दुसऱ्या बाजूने या मुख्य कारणामुळे शेती बागायतीकडे शेतकरी पाठ फिरवित आहेत, ते पाहिल्यास सरकारने यावर उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. मात्र त्या दृष्टिकोनातून अजून पर्यंत कोणत्याही उपाययोजना केलेल्या दिसत नाहीत. यासाठी शेतकऱ्यांना या प्रमुख समस्येतून बाहेर काढण्यासाठी सरकारने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे, असे जोशी म्हणाले.

# खोट्या कागदपत्रप्रकरणी संशयिताला दोन दिवस कोठडी

**मडगाव :** मायणा–कुडतरी पोलिसांनी अटक केलेल्या एम. वेर्णेकर याला दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा न्यायालयाने आदेश दिला आहे. मिथून याला पोलिसांनी शुक्रवारी अटक केली होती.

# सहवेदना

## लक्षी कांबळे

**पणजी** : टोंक–कामराभाट येथील रहिवाशी आणि पणजी महानगरपालिकेच्या निवृत्त कर्मचारी लक्ष्मी आपा कांबळे (८५) यांचे वृद्धापकाळाने रविवारी १३ रोजी राहत्या घरी निधन झाले.



अंत्यसंस्कार त्याच दिवशी पणजी सांतईनेज येथील स्मशानभूमीत करण्यात आले.

त्यांच्या पश्चात तीन मुले प्रदीप, अशोक व किशोर तसेच अविवाहित मुलगी राधा कांबळे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. तरुण भारत पणजी कार्यालयातील कर्मचारी अशोक कांबळे यांच्या त्या मातोश्री होत.

## प्रदीप मंत्री

**हरमल** : मधलावाडा येथील प्रदीप न्हानू मंत्री (४६) यांचे राहत्या घरी अल्प आजाराने १० रोजी निधन झाले. ११ रोजी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ, भावजय, पुतणे, पुतणी, काका, काकी असा परिवार आहे.

## साजू मांद्रेकर

**शिवोली** : सीमवाडा, हडफडे येथील साजू हरिश्चंद्र मांद्रेकर (७३) यांचे रविवार दि. १३ सप्टें–बर रोजी पहाटे अल्पआजाराने निधन झाले. त्यांच्यावर स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पुत्र : अमर, नीलेश, मुली : ज्योत्स्ना, किशोरी, टीना, भाऊ : कृष्णा असा परिवार आहे. ते शिवोली आरोग्य केंद्राचे फार्मासिस्ट बाबली मांद्रेकर यांचे काका होत.



## नारायण वस्त

**हरमल** : खालचावाडा हरमल येथील नाट्यकलाकार नारायण मुकुंद वस्त (५५) यांचे अल्प आजाराने राहत्या घरी काल १३ रोजी निधन झाले.

त्याचदिवशी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र, आई, वडील, दोन भाऊ, भावजया, चुलत बंधू, पुतणे, पुतणी असा मोठा परिवार आहे.

## मोहिनी रायकर

**म्हापसा** : खोर्ली म्हापसा येथील सौ. मोहिनी (सावित्री) रामदास रायकर यांचे १३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. अंत्यसंस्कार त्याच दिवशी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती–रामदास, पुत्र–संतोष, दीर–मोहन रायकर असा परिवार आहे.


**॥ श्री ब्राम्हणी रामायणी इंद्राणी रामायसती ३३ कोटी देवी प्रसन्न ॥**
**(Adulshem, Borim, Ponda-Goa)**

देणगी कूपन निकाल

| | |
|---|---|
| 1st Prize | ......20092 |
| 2nd | ......24363 |
| 3rd | ......26875 |
| 4th | ......13777 |
| 5th | ......17532 |
| 6th | ......18685 |
| 7th | .....27095 |
| 8th | ......17423 |

Prize Distribution will be held on 11/10/2020

GCM203383

**हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड**
(एक महारत्न कंपनी)
Energising Growth

**पीओएल ॲग्रिगेटरच्या नियुक्तीसाठी सूचना**

हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) ने FO/LDO/MTO आणि इंडस्ट्रियल SKO या विविध पेट्रोलियम उत्पादनांची विक्री महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, गोवा या राज्यांमध्ये तसेच दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीवच्या केंद्र शासित प्रदेशां मध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) विभागांत करण्या करीता ॲग्रिगेटर नेमण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

निवडपात्रता आणि मूल्यमापनाचे मानदंड यांचे तपशील तसेच अर्जाची प्रत एचपीसीएल च्या वेबसाइट www.hindustanpetroleum.com वरून डाउनलोड केले जाऊ शकतात. वरील जाहिरातीं मधील सर्व पुनरावृत्ती, स्पष्टीकरण, विवरण, परिशिष्ट, वेळ विस्तार इत्यादी केवळ वरील वेबसाइट वरच दिली जाईल. स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी अर्जदारांनी नियमित पणे या वेबसाइटला भेट द्यावी.

संलग्नकांसह विधिवत भरलेले अर्ज आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड च्या नावाने काढलेला ₹ ११८०/- (एक हजार एकशे ऐंशी) चा डिमांड ड्राफ्ट प्रत्येक स्थानासाठी दर्शविलेल्या पत्त्यावर १४ ऑक्टोबर २०२० ला किंवा त्या पूर्वी कार्यालयीन वेळ समाप्ती अर्थात १७:०० च्या आत सादर करावेत.